# मध्य भारतातील वन्यजीव स्थळं

**अतुल धामनकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मध्य भारतातील वन्यजीव स्थळं**
अतुल धामनकर

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
अतुल धामनकर
पटेल हायस्कूलसमोर,
शिवाजी चौक, चंद्रपूर - ४४२४०२
मो. न. : ७६२०७९२२०६, ९४२३६१९९३३
E mail : atultiger@rediffmail.com.

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-

# लेखकाचे मनोगत

भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने अतिशय संपन्न असलेला देश आहे. इथे कोणत्याही भागात गेलं तरी तुम्हाला संस्कृतीच्या विविधतेसोबत जैवविविधतेचाही आनंद घेता येतो. अगदी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातच्या पश्चिमी टोकापासून अरुणाचल प्रदेशच्या पूर्व टोकापर्यंत भारतातील वन व वन्यजीवांमध्ये कमालीचं वैविध्य आहे. या वन्य जीवनाबद्दल अभ्यासपूर्ण लेखन मागील काही वर्षांत बरंच झालंय. त्यांच्यासोबतच आज विविध दूरदर्शन वाहिन्यांवरूनदेखील वन्यजीवांच्या अंतरंगात डोकावणारे अभ्यासपूर्ण अनेक कार्यक्रम अव्याहतपणे सुरू असतात. साहजिकच आज सामान्य लोकांमध्येदेखील वन व वन्यजीवांविषयी फार उत्सुकता जागृत झाली आहे. त्याच उत्सुकतेतून ते भारतातील अनेक व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्यानं आणि वन्यजीव अभयारण्यांना भेटी देऊन तिथे नैसर्गिक अवस्थेतील वन्य जीवन न्याहाण्याचे आणि त्याला कॅमेराबद्ध करण्याचे ठरवतात.

पण असं असलं तरी वन्यजीव निरीक्षणाला सहज कुठल्याही पर्यटनासाठी बाहेर पडावं, तसं जाऊन चालत नाही. वन्यजीव क्षेत्रे नेहमीच दूरवर वसलेली असतात. बहुधा त्यांच्या आसपास मोठी शहरं-गावंही नसतात. त्यामुळे इथे जाण्यासाठी बरीच पूर्वतयारी करणं आवश्यकच ठरतं.

अशा जंगल भेटीसाठी बाहेर पडण्यापूर्वीच त्याची नीट माहिती करून आखणी करणं अतिशय गरजेचं असतं. त्यामुळे सगळ्यात आधी त्या अरण्याची इत्थंभूत माहिती मिळवणं, कुठून कसं जायचं हे ठरवणं, विमान, रेल्वे, बस, खासगी टॅक्सीची तिकिटं किंवा अग्रीम आरक्षण करणं, प्रवेशपत्र प्राप्त करणं, हॉटेल किंवा वनविश्रामगृहाचं आरक्षण करणं, त्या जागी कोणकोणते वन्य प्राणी-पक्षी आढळतात त्याची आधीच माहिती करून त्यांच्या निरीक्षण किंवा प्रकाशचित्रणासाठी काय-काय करावं लागेल, कोणती फोटोग्राफी उपकरणं सोबत घ्यावी लागणार याची आखणी करणं, हे मोठंच काम असतं. अशा वेळी अगदी छोट्याशा माहितीअभावी देखील तुमची भटकंती गोत्यात येऊ शकते. कित्येक

वेळा एखाद्या बाबीची माहिती नसल्याने प्रत्यक्ष त्या अरण्यात गेल्यावर जंगलफेरी न मिळणे, हॉटेल न मिळणे, वाहतुकीच्या साधनांची कमतरता यासारख्या बाबी तुमचा भ्रमंतीचा आनंदच हिरावून घेऊ शकतात.

आज बऱ्याच वन्यजीव क्षेत्रांत अनेक टूर ऑपरेटर्स भ्रमंती आयोजित करून देतात; पण इथे जाताना या टूर ऑपरेटर्सना फक्त हॉटेल-टॅक्सी बुकिंगशिवाय इतर कुठल्या बाबतींची माहिती आहे की नाही, हे आपल्याला माहीत नसतं. खासकरून वन्यजीव, त्यांचा आढळ, त्यांची स्थळं, वन्यजीव निरीक्षण व फोटोग्राफीच्या संधी या बाबी अशा टूर ऑपरेटर्सना माहिती आहेत काय, हे आधीच तपासून घ्यावं. कारण एखाद्या ऐतिहासिक किंवा धार्मिक स्थळाला भेट देण्यासारखं वन्यजीव पर्यटन नक्कीच नसतं. त्यात शेवटी तुम्हाला प्रवास, राहणं-खाणं या बाबींसोबतच उत्तम वन्यजीव निरीक्षणाच्या संधी मिळणंही तेवढंच महत्त्वाचं असतं. असं न झाल्यास तुमच्या अरण्यभेटीचा आनंदच कमी होऊन हिरमोड होऊ शकतो.

निसर्गात जाताना मनात उत्साह असला तरी काही अवास्तव कल्पना घेऊन मुळीच जाऊ नये. उदा. मी ताडोबाला जातोय ते वाघच बघायला चाललोय, असे बरेचजण सांगतात; पण असं करताना त्यांना वाघ हा जंगलातील अत्यंत लपून-छपून वावरणारा, धूर्त शिकारी प्राणी आहे, या गोष्टीचं भान नसतं. निसर्गाने त्याला जंगलातील कुठल्याही अधिवासात बेमालूमपणे मिसळून जाण्याची अद्वितीय अशी देणगी दिली आहे. त्यामुळेच तो अतिशय चौकस, तीक्ष्ण नाक, कान, डोळे असणाऱ्या चितळ, सांबर, रानगवे यांची शिकार करू शकतो. साहजिकच तो या जनावरांच्या तुलनेत कितीतरी कमी इंद्रियसंवेदना असलेल्या माणसापासून सहजपणे लपू शकतो. त्यामुळे वाघ बघण्याचा प्रयत्न करणं हा वन्यजीव पर्यटनातला एक भाग झाला; पण वाघच दिसला पाहिजे हा अट्टाहास चुकीचाच ठरतो. त्याशिवायदेखील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आणखी ४४ प्रजातींचे सस्तन प्राणी आणि २८० पेक्षा जास्त प्रकारचे रंगीबेरंगी पक्षीपण आहेत, हे लक्षात ठेवावं. म्हणजे तुम्ही जंगलात फिरताना तुम्हाला लगेचच वाघ दिसेल असं होणार नाही; पण बरेच पक्षी, प्राणी हे नक्कीच दिसतील. त्यामुळे त्यांच्याकडे डोळसपणे बघणं, त्यांचं निरीक्षण करणं हा आनंद तुम्ही भरपूर प्रमाणात घेऊ शकता. पुढे जेव्हा तुम्हाला कधीही वाघ दिसेल तेव्हा तो आनंद द्विगुणित होईल, याची खात्री बाळगा.

आजकाल निसर्ग पर्यटनाला निघताना अनेकजण कुटुंबासह मित्रफोटोग्राफर्सचा ग्रुप किंवा लहान-मोठ्या गटाने जातात. त्यावेळी प्रत्येकाचा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो; पण निसर्ग, वन्य जीवन हे आपल्या ताब्यात नाही, तसेच त्यांना कुठल्याही वेळेचे बंधनसुद्धा नसते, हे नीट ध्यानात ठेवावं. त्यामुळे एखाद्या स्थळाला भेट देण्यासारखं न जाता या पर्यटनासाठी जास्तीचा वेळ ठेवावा. बरेचजण अशा जागी जातानादेखील धावती भेट देतात. जेव्हा कुणी मला गर्वाने सांगतात, की हो आम्हीसुद्धा भरतपूरला जाऊन आलोय आणि तिथे चांगलं दीड तास होतो, तेव्हा या वाक्यावर हसावं की रडावं, हेच कळत नाही. जयपूरहून आग्ऱ्याला जाताना हे भोज्याला शिवल्यासारखं वाटेतल्या भरतपूरला फक्त हात लावून येतात. खरं तर युनेस्कोची 'वर्ल्ड हॅरिटेज साईट' असलेलं भरतपूर जगातलं एक उत्कृष्ट पक्षी अभयारण्य आहे. इथे कमीत कमी ३-४ दिवस घालवले नाहीत, तर तुम्ही त्याचं नीट निरीक्षणसुद्धा करू शकणार नाही. त्यामुळेच कुठेही निसर्ग पर्यटनाला जाताना चार दिवसांत तीन अभयारण्ये किंवा सहा दिवसांत चार-पाच जंगलांना भेटी देण्याचे प्रोग्राम मुळीच आखू नयेत. त्यामुळे तुम्हाला कोणत्याही जंगल व त्यातील वन्यजीवांचे नीट अवलोकन करायची संधी मिळणार नाही. साहजिकच तुमचे वन्यजीव निरीक्षणाबद्दलचे मत कलुषित होण्याची शक्यता असते. आम्ही चांगले एक दिवस ताडोबात होतो आणि तरीही आम्हाला वाघ दिसला नाही, असे म्हणणाऱ्यांना मी नेहमी सांगतो की, इथे तुम्ही तीन-चार दिवस राहून कमीत कमी चार ते सहा जंगल सफारी केल्या तरच तुम्हाला नीट वन्यजीव निरीक्षण करायची संधी मिळू शकेल.

कुठलाही वन्य प्राणी खात्रीशीर दिसणं ही बाब गृहीत धरणं हेच चुकीचं आहे. 'वन्य' या शब्दातच ते ध्वनित होतं. वन्य जीवन हे ठरवून बघता येत नाही, यातच त्याची गोडी आणि आनंद टिकून असतो. त्यामुळे पुढे काय घडणार, काय दिसणार, ही हुरहूर तुम्हाला परत-परत त्याच जंगलाकडे आकृष्ट करते. त्यामुळे बरेच निसर्गप्रेमी सतत, एकाच जंगलाच्या वर्षानुवर्षे वाऱ्या करूनदेखील कंटाळत नाहीत.

मी या पुस्तकात जंगल व वन्यजीव पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टींचा अंतर्भाव करायचा प्रयत्न केला आहे. मी मागील २३ वर्षे भारतातील विविध अरण्यांतून वन्य जीवांचं निरीक्षण, अभ्यास आणि प्रकाशचित्रणासाठी

भटकंती करतोय. त्यातूनच आलेल्या अनुभवांवर हे पुस्तक आधारित आहे. त्यामुळे याचा निसर्गप्रेमी भटक्यांना भरपूर उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे. त्याशिवाय कुणाला आणखी काही माहिती हवी असल्यास त्यांनी खालील मोबाईल नंबर किंवा ई-मेलवर माझ्याशी संपर्क साधावा.

भारतातील पश्चिम, पूर्व, दक्षिण, उत्तर आणि मध्य या पाच भागांवरील मालिकेतील 'मध्य भारतातील वन्यजीव स्थळं,' हे पुस्तक तुमच्या हातात देताना खूप आनंद होतोय. यासाठी मी माझे प्रकाशक व इतर प्रत्येकाचा ज्यांचा हातभार या पुस्तकाच्या निर्मितीसाठी लागलाय त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

धन्यवाद!

आपला,
अतुल धामनकर,

✦✦✦

# अनुक्रमणिका


१) इंद्रावती व्याघ्र प्रकल्प ........................................ ११
२) बांधवगड व्याघ्र प्रकल्प ........................................ १३
३) बोरी सातपुडा व्याघ्र प्रकल्प ........................................ १९
४) कान्हा व्याघ्र प्रकल्प ........................................ २३
५) पन्ना व्याघ्र प्रकल्प ........................................ ३१
६) पेंच व्याघ्र प्रकल्प ........................................ ३५
७) मेळघाट व्याघ्र प्रकल्प ........................................ ४३
८) पेंच व्याघ्र प्रकल्प ........................................ ५१
९) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ........................................ ६१
१०) उदंती-सीतानदी व्याघ्र प्रकल्प ........................................ ६९
११) नागझिरा नवेगाव व्याघ्र प्रकल्प ........................................ ७१
१२) बोर व्याघ्र प्रकल्प ........................................ ७३
१३) रातापानी व्याघ्र प्रकल्प ........................................ ७७
१४) अचानकमार व्याघ्र प्रकल्प ........................................ ७९
१५) संजय धुब्री व्याघ्र प्रकल्प ........................................ ८१
१६) गुरू घासीदास राष्ट्रीय उद्यान ........................................ ८३
१७) घुगुवा फॉसिल राष्ट्रीय उद्यान ........................................ ८५
१८) कांगेर घाटी राष्ट्रीय उद्यान ........................................ ८७
१९) माधव राष्ट्रीय उद्यान ........................................ ८९
२०) भैरमगड वन्यजीव अभयारण्य ........................................ ९१
२१) बारनवापारा वन्यजीव अभयारण्य ........................................ ९३
२२) सेमरसोत वन्यजीव अभयारण्य ........................................ ९५
२३) तामोर पिंगला वन्यजीव अभयारण्य ........................................ ९७
२४) पामेड वन्यजीव अभयारण्य ........................................ ९९
२५) बादलखोल वन्यजीव अभयारण्य ........................................ १०३


२६) गोमारदा वन्यजीव अभयारण्य .................................... १०५
२७) भोरमदेव वन्यजीव अभयारण्य .................................... १०७
२८) बागदरा वन्यजीव अभयारण्य ..................................... १०९
२९) फेन वन्यजीव अभयारण्य.......................................... १११
३०) घाटीगाव वन्यजीव अभयारण्य.................................... ११३
३१) गांधीसागर वन्यजीव अभयारण्य .................................. ११५
३२) करेरा वन्यजीव अभयारण्य ....................................... ११७
३३) केन घडियाल अभयारण्य.......................................... ११९
३४) खेओनी वन्यजीव अभयारण्य...................................... १२१
३५) नरसिंहगढ वन्यजीव अभयारण्य .................................. १२३
३६) नॅशनल चंबल अभयारण्य ......................................... १२५
३७) नौरादेही वन्यजीव अभयारण्य .................................... १२७
३८) पचमढी वन्यजीव अभयारण्य ..................................... १२९
३९) पानपथा वन्यजीव अभयारण्य..................................... १३३
४०) कुनो वन्यजीव अभयारण्य ........................................ १३५
४१) सिंघोरी वन्यजीव अभयारण्य ..................................... १३७
४२) सोन घडियाल अभयारण्य ......................................... १३९
४३) सरदारपूर वन्यजीव अभयारण्य .................................. १४१
४४) सैलाना वन्यजीव अभयारण्य ..................................... १४३
४५) चपराळा वन्यजीव अभयारण्य .................................... १४५
४६) भामरागड वन्यजीव अभयारण्य ................................... १४७
४७) टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य...................................... १४९
४८) उमरेड-कऱ्हांडला वन्यजीव अभयारण्य ........................... १५१
४९) जंगलात जाताना................................................... १५३


✦✦✦











# इंद्रावती व्याघ्र प्रकल्प

## शापीत नंदनवन

**राज्य :** छत्तीसगड
**जिल्हा :** दंतेवाडा
**कुठे आहे :** इंद्रावती नदीजवळ स्थित.
**अंतर :** जगदलपूरपासून १६८ कि.मी.वर

**अरण्याबद्दल थोडंसं :** छत्तीसगड-महाराष्ट्राच्या सीमेलगत इंद्रावती नदीच्या अगदी काठावरील दंतेवाडा जिल्ह्यात निसर्गसौंदर्याने नटलेला 'इंद्रावती व्याघ्र प्रकल्प' स्थित आहे एके काळी बस्तरच्या वैभवशाली जंगलाचे प्रतीक असलेले हे साल व इतर मिश्र प्रकारचे घनदाट जंगल आता मात्र नक्षलवादी चळवळीमुळे बरेच दुर्लक्षित झाले आहे. या व्याघ्र प्रकल्पाची घोषणा १९८१ साली करण्यात आली. एकूण १५४०.७१ चौ.कि.मी.चे हे मोठे अरण्य रानम्हशींसारख्या दुर्मीळ वन्यजीवांच्या वास्तव्याने सजीव झालेले आहे.

**कशी कराल भ्रमंती :** सध्या इथे पायी किंवा वाहनाने फिरणे जरासे त्रासदायक आहे. स्थानिक वनखात्याचा सल्ला घ्यावा.

**कशासाठी जाल :** रानम्हैस, वाघ, शेकरू आणि अनेक प्रकारचे स्थानिक आणि स्थलांतरित पक्षी.

**जाण्याचा उत्तम काळ :** डिसेंबर ते मे असा आहे.

**वनस्पती :** साल, साग, भेरा, बिजा, हळदू, गराडी, धावडा, हिरडा, हिवर, खैर, चारोळी, आंबा, वड, करंज आणि बांबू, गवत व अनेक वनौषधी.

**वन्य प्राणी :** वाघ, बिबळा, पट्टेरी तरस, कोल्हा, रानम्हैस, शेकरू, वानर, साळिंदर, खवल्या मांजर, चितळ, सांबर, काकर, वटवाघूळ, झिपरे अस्वल, रानकुत्रा, नीलगाय.

**पक्षीजीवन :** पावशा, चातक, रंगीत करकोचा, मत्स्यघुबड, वेडा राघू, टकाचोर, सर्पगरुड, शिक्रा, कापशी, व्याघ्र, कोतवाल, महाभृंगराज, पोपट, धाविक, मुनिया.

**सरपटणारे जीव :** नाग, मण्यार, पट्टेरी मण्यार, घोरपड, अजगर, रानसरडा, सापसुरळी.

**कुठे-काय बघाल :** उन्हाळ्यात इंद्रावती नदीत कधी-कधी रानम्हशी उतरलेल्या दिसतात.

**आसपासची बघण्यायोग्य स्थळं :**

१) चित्रकोट धबधबा

२) जगदलपूर

**कसे जाल :**

**जवळचे विमानतळ :** रायपूर (४९६ कि.मी.)

**जवळचे रेल्वे स्टेशन :** जगदलपूर ( १६८ कि.मी.)

**जवळचे बस स्थानक :** बिजापूर.

या व्याघ्र प्रकल्पात पोहोचण्यासाठी रायपूर किंवा जगदलपूरहून खासगी वाहन भाड्याने घेतल्यास इथे आरामात पोहोचता येईल.

**कुठे राहाल :** इथे राहण्यापेक्षा जगदलपूरला 'छत्तीसगड टूरिझम बोर्ड'च्या उत्तम हॉटेलमध्ये राहता येईल.

**अधिक माहितीसाठी व प्रवेशपत्रासाठी :**


क्षेत्र संचालक,

इंद्रावती व्याघ्र प्रकल्प, बिजापूर, छत्तीसगड

फोन : ०७७८२-२२५०७३

Email:ctwlitrjdp@rediffmail.com

✦



# बांधवगड व्याघ्र प्रकल्प

## वाघाच्या मागे चला...

**राज्य :** मध्य प्रदेश
**जिल्हा :** शहडोल
**कुठे आहे :** मैकल पर्वतरांगांत स्थित.
**अंतर :** उमरियापासून ३२ कि.मी.वर

**अरण्याबद्दल थोडंसं :** टळटळीत दुपार होती. उन्हाळ्याचा प्रचंड उष्णतेचा दिवस मध्य प्रदेशच्या जंगलात घुसमट वाढवणारा असतो. माझी जिप्सी ताला गेटमधून आत शिरली. थोडं अंतर गेल्यावर आसपासच्या साल, आंबा या झाडांची शीतलता मला बरी वाटली. उजवीकडे आंब्याच्या झाडांमधून नाला खळखळत वाहत होता. भर उन्हाळ्यातदेखील या ठिकाणी वाहणारा नाला पाहून मला खूप छान वाटलं.

आंब्याच्या दाटीमध्ये अनेक पक्षी थोडीशी हालचाल करत पाण्यावर सतत येत होते. खाली पाण्याकाठच्या थंडगार चिखलात बुलबुल, टकाचोर, कोतवाल पाय बुडवून पाणी पीत बसले होते. तेवढ्यात माझी नजर वरच्या एका जाड, आडव्या फांदीकडे गेली. त्या जागी एक मोठा मत्स्यघुबड शांतपणे बसून होता. त्याचे डोळे अर्धवट उघडे होते, दिवस ही त्याची विश्रांतीची वेळ असल्याने तो आपली झोप काढत असावा. अचानक पाण्याकाठचे सगळे पक्षी जोराचा कल्ला करीत उडाले. शांत जंगलामध्ये त्यांचा भीतीदायक चीत्कार घुमला. मीपण चमकून तिकडे पाहिलं. एक सर्पगरुड आपल्या पंखांचा भव्य पिसारा उघडून सरळ पाण्याकाठी उतरला. या आभाळातल्या शिकाऱ्याच्या आगमनाने सगळे पक्षी भयभीत होणं साहजिकच होतं. दोन-चारदा चोच बुडवून पाणी प्यायल्यावर तो उडाला आणि झाडांमध्ये गडप झाला.

थोड्याच वेळात आम्ही सिद्धबाबाच्या गवती मैदानात पोहोचलो. इथे शंकराचं एक लहानसं मंदिर आहे. त्याचंच नाव सिद्धबाबा. या गवती मैदानात मी अनेक वेळा वाघाचं चांगलं दर्शन घेतलं होतं. तिथून पुढे चक्रधारा मैदान, गोपालपूर पाणवठा असे करत आम्ही भरपूर भटकलो; पण आज वाघ काही दिसायला तयार नव्हता. दुपारी

साडेचार वाजता आम्ही बरीचशी चितळं, सांबरं पाहून परत फिरलो. आता दिवस उतरायला सुरुवात झाली होती. त्यामुळे चक्रधारा किंवा सिद्धबाबाच्या मैदानाजवळ वाघाची हालचाल होण्याची शक्यता होती.

अजूनही उन्हाचा सणका चांगलाच होता. मी कानावर दुपट्टा बांधून वर हॅट घातली होती. तरीही गरम वाऱ्याच्या झळा चटचटा झोंबत होत्या. उष्णतेने वारंवार घसा कोरडा पडत होता. चक्रधारा मेडोजवळ पोहोचलो तर पलीकडून एक पुसटसा सांबराचा धोक्याचा इशारा ऐकू आला; पण मलाच त्याची खात्री नव्हती. त्यामुळे मी ड्रायव्हरला जिप्सी थांबवायला सांगितली. जिप्सी एका सालच्या सावलीत उभी करून मी कानाचे सूप करून इशारा परत ऐकण्यासाठी उभा राहिलो. पुढची दहा मिनिटं काहीच घडलं नाही. टकाचोर, बुलबुल, मैनांचाच आवाज सगळीकडून येत होता; पण तेवढ्यात मैदानापलीकडच्या सालच्या जंगलातून मला अपेक्षित असलेला आवाज आला.

''पाँक ऽऽ पाँकऽऽऽ''

हा सांबराचा 'अलार्म कॉल' होता. सांबराचा इशारा हा वाघाच्या उपस्थितीचा खात्रीशीर पुरावा होता. आता माझ्या आशा पल्लवित झाल्या. मी जिप्सीच्या सीटवर उभा राहून दुर्बिणीतून विरळ सालमधून नजर फिरवू लागलो; पण बराच वेळ झाला तरी काहीच दिसत नव्हतं. सांबर अजूनही अधून-मधून इशारे देतच होता.

''सर, वो देखो वहाँ घास के पीछे कुछ हिल रहा है?'' माझा गाईड मैदानापलीकडे बोट दाखवत उद्गारला.

मी चटकन तिकडे दुर्बीण वळवली. एका साल वृक्षाखाली बरेच गवत होते. तिथे थोडी हालचाल मलापण जाणवली; पण नीट काहीच दिसत नव्हतं. अचानक उडी मारून एक वाघ बाहेर निघाला.

''टायगर, टायगर आहे तिथे!'' मी आनंदाने बारीक आवाजात चीत्कारलो.

लगेचच त्याच्या मागून दुसरा वाघही बाहेर आला. हे दोघेही एकाच विणीतले आणि आता दोन वर्षे वयाचे वाघबच्चे होते. यांना बघण्यासाठी मी अनेक दिवसांपासून प्रयत्नरत होतो; पण ते शेवटी आज नजरेस पडले होते.

गवताबाहेर मोकळणात आल्यावरदेखील त्यांचा एकमेकांसोबत खेळण्याचा सोस काही कमी होत नव्हता. ते मधून वेगाने पळत आणि एकमेकांचा पाठलाग करत. त्या खेळामुळे मला तरुण वाघांच्या वागणुकीचं निरीक्षण करायला मिळत होतं. जंगलात अशा गोष्टी पाहायला मिळणं नेहमीच दुर्मीळ असतं. त्यामुळे मी मनोमन सुखावलो होतो.

अचानक त्यापैकी एक पिल्लू पळतच शेजारच्या नाल्याकडे गेलं आणि पाण्यात धाबकन् उडी मारली. दुसराही त्याच्या मागे होताच. तोही पाण्यात शिरताच दोघांची जबरदस्त दंगा-मस्ती सुरू झाली. वाघांना पाणी फार आवडतं. आता तर उन्हाळाच असल्याने वाघांना पाण्याची नितांत गरज होती. त्यामुळे हे वाघबच्चे खेळण्यात मग्न झाले होते.

मी आसपास चौकसपणे पाहिलं; पण यांची आई मला कुठेच दिसली नाही. खरं तर ही पिल्लं आता बरीच मोठी झाली होती. चार-पाच महिन्यांत ती आईपासून सुटणार होती. त्यामुळे आता त्यांच्या सुरक्षिततेसाठी सतत जवळपास राहण्याची मुळीच गरज नव्हती. साहजिकच वाघिणीने हा दुपारचा वेळ सालच्या थंडगार सावलीत आरामात झोप काढण्यात घालवला असावा. या पिलांना शिकारीचे ज्ञान देणे, त्यांना वेगवेगळ्या जागी फिरवणे, जंगलाचा परिचय करून देणे, एवढेच तिचे आता काम उरले होते.

प्रचंड धमाल केल्यावर दोन्ही पिल्लं आता जराशी थकली होती. त्यांनी लुटुपुटुची लढाई घटकाभर थांबवून आरामात पाण्यात बसणं पसंत केलं होतं. पाण्यात बसूनच ते जिभेने लपलप करत पाणी पित होते. धाप लागल्यामुळे त्यांची पोटं सतत वरखाली होत होती. मीपण बाटलीतील कोमट झालेल्या पाण्याचे दोन घोट घशाखाली ढकलले. हातातल्या कॅमेरा, दुर्बिणीवरचा घाम फडक्याने पुसला आणि परत व्याघ्रदर्शनासाठी सज्ज झालो.

सुमारे पंधरा मिनिटं सगळं शांत होतं. वाऱ्याच्या जोराच्या झोताबरोबर सालची हिरवी पानं सळसळत होती. सूर्य कलायला लागल्यामुळे आता उष्मा तेवढा जाणवत नव्हता; पण अजूनही मध्येच एखादी गरम वाऱ्याची झळ सहज येऊन जायची.

तेवढ्यात एका बच्च्याने पाण्यातून उसळी घेतली ती थेट दुसऱ्याच्या अंगावर. दुसरा बच्चा अगदीच बेसावध होता. त्यामुळे त्या हल्ल्याने तो पुरता गांगरून गेला. दोघेही क्षणभर पाण्याखाली गडप झाले. वर येताच त्यांनी मागच्या पायावर उभे राहात एकमेकांना पुढच्या पंजाचे फटके द्यायला सुरुवात केली. एकच गोंधळ उडाला. सगळीकडे नाल्याचे पाणी उडत होते. पाण्याचा छाप-छपाक आवाज होत होता. मी आश्चर्यचकित होऊन वाघांच्या या लढतीकडे बघत होतो. वाघ बच्च्यांसाठी ही लुटुपुटुची लढाई केवळ खेळ किंवा वेळ घालवण्याचे साधन नव्हते. त्यांना शिकारीवर हल्ला करण्याचे, दबा धरण्याचे, शिकारीला नीट पकडण्याचे, हल्लेखोरांना गारद करण्याचे हे महत्त्वाचे शिक्षण होते. याच लढाया किंवा खेळातून वाघाच्या पिल्लांना पुढे आईपासून सुटल्यावर एकटं जगतानाचे महत्त्वाचे शिक्षण प्राप्त होते. त्यावेळी सोबत